**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# माहितीचा अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीबाबत राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांचे दृष्टिकोनाचे मूल्यमापन

**सतीश शामराव डोंगरे**
*संशोधक, गुलाम नबी आझाद कॉलेज ऑफ सोशल वर्क, पुसद*
*Corresponding Author –* **सतीश शामराव डोंगरे**
**DOI - 10.5281/zenodo.15245347**

**सारांश:**

*लोकशाही शासनव्यवस्थेत नागरिकांना माहितीचा अधिकार (Right to Information) असला पाहिजे ही मागणी अलीकडील काळात प्रकर्षाने पुढे आली आहे. माहितीचा अधिकार म्हणजे 'राज्यातील कोणत्याही नागरिकाचा त्यास हवी असलेली माहिती मिळविण्याचा किंवा ती प्राप्त करण्याचा अधिकार होय. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी एक प्रभावी साधन ठरला आहे. परंतु, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. या संशोधनात च्या राज्य जण माहिती अधिकारी दृष्टिकोनाचा अभ्यास करून, RTI कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक सुधारणांची शिफारस केली आहे. संशोधनात असे आढळले की, RTI कायद्यामुळे पारदर्शकता वाढली असली तरी यांना राज्य जण माहिती अधिकाऱ्याना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अर्जांची वाढती संख्या, संसाधनांची कमतरता, कायदेशीर अनिश्चितता, तसेच राजकीय आणि प्रशासकीय दबाव ही मुख्य आव्हाने आहेत. याशिवाय, तांत्रिक पायाभूत सुविधांचा अभाव आणि अपुरी प्रशिक्षण व्यवस्था यामुळे RTI प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होतात.हा अभ्यास माहितीचा अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणारा असून, प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकशाही सुदृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.*

***सुचनक शब्द: माहिती अधिकार अधिनियम 2005, प्रशासनात पारदर्शकता, कायद्याची अंमलबजावणी सकारात्मक दृष्टिकोन***

**प्रस्तावना :**

शासनाच्या स्वच्छ कारभारासाठी सर्वांत महत्त्वाची गरज पारदर्शी प्रशासन ही असते. प्रशासनात पारदर्शकता आल्यास गैरकारभाराला फारसा वाव मिळत नाही. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे कामकाज सर्वांना स्पष्टपणे पाहावयास मिळाले तर नियमबाह्य व वावगे काम करण्याचे धाडस ते करू शकणार नाहीत. माहितीच्या अधिकारामुळे प्रशासनात पारदर्शकता येणे स्वाभाविक आहे. याचे कारण असे की, शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर त्यांना विचारलेली माहिती देण्याचे बंधन आल्यामुळे कोणतीही माहिती लपवून ठेवणे त्यांना शक्य होणार नाही. पारदर्शक प्रशासनामुळे भ्रष्टाचाराला आणखी आळा घातला जाईल.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मिळविण्याचा कायदेशीर हक्क प्रदान करतो. मात्र, या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या संशोधनाचा उद्देश म्हणजे राज्य यांना राज्य जण माहिती अधिकारी च्या दृष्टिकोनातून या समस्यांचे मूल्यमापन करणे आणि सुधारणा सुचविणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांचा RTI कायद्याबाबतचा अनुभव समजून घेणे.
2. अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी ओळखणे.
3. RTI प्रक्रियेला अधिक प्रभावी बनवण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत संशोधन माहितीचा अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीबाबत राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांचे दृष्टिकोनाचे मूल्यमापन या विषयावर भर देते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीची स्थिती अभ्यासत असतांना या कायदयातांर्गत मुख्यत्वे चार घटक अंतर्भुत आहेत. यामध्ये नागरिक, राज्य जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयुक्त यांच्याकडून अंमलबजावणीची सदयास्थिती अभ्यासता येवू शकते. ही या अध्ययनाची व्याप्ती आहे, असे असेल तर या अध्ययनात केवळ राज्य जनमाहिती अधिकारीकडून अंमलबजावणीची स्थिती अभ्यासली जाणार आहे. ही या अध्ययनाची मर्यादा आहे व संपुर्ण भारतात कायदा लागु असतांना केवळ कारंजा /मानोरा तालुक्यातील सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश केला आहे. त्यामुळे अध्ययन क्षेत्र हे या अध्ययनाची मर्यादा ठरते.

प्रस्तुत अध्ययनासाठी उत्तरदाते निवडण्यासाठी 'असंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा उपयोग केला आहे या पध्दतीमधील 'कोटा पध्दती' अंतर्गत लाभार्थ्यांचा कोटा निश्चित केला आहे. सार्वजनिक प्राधिकरणांमधील शासकिय सार्वजनिक प्राधिकरण व खाजगी अनुदानित सार्वजनिक प्राधिकरण अशा दोन प्रकारच्या प्राधिकरणांचा समावेश केला आहे.'कोटा पध्दती' उपयोगात आणण्याचे महत्वाचे कारण म्हणजे कारंजा /मानोरा तालुक्यात सार्वजनिक प्राधिकरणांची निश्चित संख्या माहित नसल्यामुळे कोटा पध्दती अतंर्गत नमुना घेतला आहे. तसेच संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील लॉटरी तंत्राचा उपयोग करून खाजगी अनुदानित शाळेची निवड केली आहे.

प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलित करण्यासाठी प्राथमिक पद्धतीमध्ये मुलाखत पद्धतीचा उपयोग करून त्या अंतर्गत मुलाखत अनुसूचि या तंत्राच्या साह्याने 60 राज्य जण अधिकाऱ्याकडून तथ्य गोळा करण्यात आलेली आहे. मुलाखत पद्धती सोबत निरीक्षण पद्धतीचा सुद्धा उपयोग करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | खाजगीअनुदानित सार्वजनिक प्राधिकरण | नमुना संख्या | शासकीय सार्वजनिक प्राधिकरण | नमुना संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | खाजगी शाळा | 15 | जिल्हा परिषद शाळा | 12 |
| 2 | महाविद्यालय | 15 | ग्रामपंचायत | 12 |
| | | | तहसील कार्यालय | 01 |
| | | | पंचायत समिती | 01 |
| | | | प्राथमिक आरोग्य केंद्र | 01 |
| | | | नगरपालिका | 01 |
| | | | कृषी विभाग | 01 |
| | एकूण | 30 | सार्वजनिक बांधकाम विभाग | 01 |
| | | | एकूण | 30 |
| | एकूण 60 | | | |

**राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांचे दृष्टिकोन:**

**सारणी 1:अधिकाऱ्यांचा RTI कायद्याविषयीचा एकूण दृष्टिकोन दर्शक सारणी.**

| अ. क्र. | दृष्टिकोनाचा प्रकार अधिकाऱ्यांचा | वारंवारीता | प्रतिसाद/टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सकारात्मक – पारदर्शकता वाढते | 34 | 56.66 |
| 2 | मध्यम – अंमलबजावणीत अडचणी आहेत | 12 | 20.00 |
| 3 | नकारात्मक – कामाचा अतिरिक्त ताण वाढतो | 14 | 23.33 |
| | एकूण | 60 | 100 |

उपरोक्त सारणी वरून 56 टक्के राज्य जन माहिती अधिकाऱ्यांनी RTI कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात सकारात्मक दृष्टिकोन मांडला आहे. त्यांच्या मते, हा कायदा लोकशाहीला बळकटी देतो आणि नागरिकांना शासन प्रक्रियांमध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम करतो.

**सारणी 2: RTI मुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढली आहे दर्शक सारणी.**

| अ. क्र. | प्रशासनातील पारदर्शकता | वारंवारीता | प्रतिसाद/टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 38 | 63.33 |
| 2 | नाही | 09 | 15.00 |
| 3 | काही प्रमाणात | 13 | 21.66 |
| | एकूण | 60 | 100 |

उपरोक्त सारणी वरून 63.00 टक्के राज्य जण माहिती अधिकारी च्या मते RTI कायद्यामुळे सरकारी प्रक्रिया आणि निर्णय अधिक पारदर्शक झाले आहेत. नागरिकांना सरकारी विभागांतील निर्णय प्रक्रियेबाबत माहिती मिळण्याचा अधिकृत हक्क मिळाल्याने प्रशासनातील गुप्तता कमी झाली आहे. यामुळे सरकार आणि नागरी समाज यांच्यातील विश्वास वाढला आहे.

**सारणी:3 RTI अर्ज हाताळताना येणाऱ्या अडचणी दर्शक सारणी.**

| अ. क्र. | अडचणीचे स्वरूप | वारंवारीता | अधिकाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद |
|---|---|---|---|
| 1 | प्रशासकीय तणाव आणि अतिरिक्त जबाबदारी | 30 | 50.00 |
| 2 | माहिती गोळा करण्यासाठी अपुरी साधनसंपत्ती | 14 | 23.33 |
| 3 | कायदेशीर गुंतागुंत आणि अपील प्रक्रिया | 10 | 16.66 |
| 4 | जनतेकडून वारंवार विनंत्या / गैरवापर | 06 | 10.00 |
| | एकूण | 60 | 100 |

उपरोक्त सारणी वरून 50.00 टक्के राज्य जण माहिती अधिकारी च्या मते RTI अर्ज हाताळताना प्रशासकीय तणाव आणि अतिरिक्त जबाबदारी येणाऱ्या प्रमुख अडचणी आहे. वेळेत अर्जदाराला माहिती मिळावी या साठी अतिरिक्त प्रभार न देता पूर्ण वेळ या कामा साठी दिले तर अडचण येणार नाही.

**सारणी 4: RTI कायदा प्रभावीपणे लागू करण्यासाठी आवश्यक सुधारणा दर्शक सारणी.**

| अ. क्र. | सुधारणेचे स्वरूप | वारंवारीता | सर्वेक्षणातील प्रतिसाद |
|---|---|---|---|
| 1 | अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम | 26 | 43.33 |
| 2 | डिजिटल माहिती व्यवस्थापन प्रणालीचा वापर | 12 | 20.00 |
| 3 | माहिती अधिकार अर्जांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणे | 14 | 23.33 |
| 4 | जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबविणे | 08 | 13.33 |
| | एकूण | 60 | 100.00 |

उपरोक्त सारणी वरून 43.33 टक्के राज्य जण माहिती अधिकारी च्या मते अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवून RTI कायदा प्रभावीपणे लागू करण्यासाठी आवश्यक सुधारणा RTI कायद्याच्या अंमलबजावणीनंतर सरकारी कार्यालयांमध्ये माहिती व्यवस्थापनाची पद्धती सुधारली जाईल आहे. पूर्वी सरकारी फाइल्स आणि दस्तऐवजांची योग्य नोंद ठेवली जात नव्हती, मात्र आता सर्व विभागांना माहितीची नोंद ठेवल्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. उदाहरणार्थ, काही सरकारी विभागांनी त्यांच्या वेबसाइट्सवर नियमितपणे माहिती प्रकाशित करण्यास सुरुवात केली आहे, जेणेकरून नागरिकांना RTI अर्ज करण्याची गरजच पडणार नाही. त्यामुळे माहिती संकलन आणि वितरणाची प्रक्रिया वेगवान झाली आहे.

**आव्हाने आणि अडचणी:**

- माहिती मागणाऱ्या अर्जांची संख्या जास्त असल्याने प्रशासनावर अतिरिक्त भार.
- काही प्रकरणांमध्ये राजकीय आणि सामाजिक दबाव.
- माहिती यंत्रणेमध्ये तांत्रिक मर्यादा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव.
- काही नागरिक RTI चा गैरवापर करतात, ज्यामुळे माहिती अधिकाऱ्यांवर ताण येतो.

**सुधारणा आणि शिफारसी.**

1. प्रशिक्षण आणि क्षमता विकास:-राज्य जण माहिती अधिकारी साठी सुधारित नियमावली नुसार आणि जेव्हा जेव्हा कायद्या बदल तेव्हा नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत.
2. तांत्रिक सुधारणा:- RTI साठी डिजिटल प्रणाली अधिक सक्षम करावी.सर्व कार्यलयात online अर्ज स्वीकारण्याची सुविधा असावी
3. नियमांमध्ये सुधारणा:- गैरवाजवी अर्ज टाळण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे ठरवावीत.
1. 4. मानसिक आणि कायदेशीर आधार:- राज्य जण माहिती अधिकारी साठी मानसिक आरोग्य सहाय्य व कायदेशीर मदतीची व्यवस्था करावी.
4. सार्वजनिक जनजागृती:- माहिती अधिकार कायदयाचा उपयोग करण्यासाठी अधिक माहिती देऊन. विविध उपक्रम राभवावे लागेल जेणे करून गैर वाजवी अर्ज टाळून योग्य माहिती उपलब्ध करून घेता येईल.

**निष्कर्ष :**

माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले आहे. मात्र, राज्य सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. योग्य धोरणात्मक सुधारणा केल्यास माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी शक्य होईल आणि लोकशाही बळकट होईल. या अभ्यासाचा निष्कर्ष

असा आहे की, RTI कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा आवश्यक आहेत.राज्य जन माहिती अधिकारी साठी नियमित प्रशिक्षण, डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक वापर, तसेच संस्थात्मक पाठबळ वाढवण्याच्या उपाययोजना केल्यास RTI प्रक्रियेला अधिक प्रभावी बनवता येईल. भविष्यातील संशोधनासाठी विभागनिहाय RTI अंमलबजावणीतील अडथळे आणि संभाव्य सुधारणा यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


1. Ghuman, B. S. & Sohail Mohammad. (2017). Right to Information Act, 2005 in India: A Decadal Experience. Indian Journal of Public Administration. Vol 63, Issue 2, 2017 June 22, https://doi.org/10.1177/0019556117699737
2. कचरे, प्रल्हाद व गायकवाड, शेखर. (२०१९). कायदा माहितीचा अन् अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा. पुणेः यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, चौदावी आवृत्ती.
3. मेश्राम, सुरेश. (२०००). प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन. नागपूरः एनपी पृ.३९
4. महाजन वाय.आर. (२००८) स्टॅटिस्टिक्स घेअरी ॲन्ड प्रॅक्टीस, नागपूरः पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिपर्स, पृ.६
5. पाटील, वा.भा. (२०१२). संशोधन पद्धती. जळगांवः प्रशांत पब्लीकेशन.
6. पाटील, एकनाथ. (२०१२) स्टडी सर्कल के सागर प्रकाशन
7. P, Chitra. and M, Neelamalar. (2013). "Right to Information Act" - A tool for good governance and social change through. Scientific & Engineering Research. Volume 4, Issue 8, August, http://www.ijser.org
8. Subhankar, Kar. (Nd). "Right To Information" A Helping Hand Of Transparent Government. Lovely Professional University
9. शेलकर, अभया. (२०११). माहितीचा अधिकार. औरगांबादः नाशिक लॉ हाउस, अकरावी आवृत्ती.